नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४ Issue - 24 | वार मंगळवार दि. १० जून २०२५ Blow- Tuesday Date 10 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुंबईत रेल्वे अपघातात ८ जणांचा मृत्यू, ५ जखमी

## मृतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वाहिली श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मध्य रेल्वेवरील मुंब्रा रेल्वेस्थानकाजवळ आज (९ जून) सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास भयंकर रेल्वे दुर्घटना घडली. मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान १३ जण रेल्वेमधून पडले. कसाऱ्याहून सीएसएमटीला जाणाऱ्या लोकलमध्ये प्रवासी लटकून जात होते. त्याचवेळी सीएसएमटीवरुन निघालेली दुसरी लोकल प्रवाशांना घासली. यावेळी १३ प्रवासी खाली पडले आणि ८ प्रवाशांचा मृत्यू झाला.

ठाण्याचे नायब तहसीलदार दिनेश पैठणकर यांनी एबीपी माझाला माहिती दिली. दरम्यान जखमींवर कळवा आणि मुंब्र्यातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १० जखमींपैकी एकाचा मृत्यू झाल्याची माहिती कळवा रुग्णालयाने दिली. तर कळव्यातील काही जखमींना ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सदर अपघात झाला तेव्हा सुरुवातीला पुष्पक एक्सप्रेसमधून प्रवासी खाली पडल्याची माहिती सांगण्यात येत होती. मात्र पुष्पक एक्सप्रेसचा काहीही संबंध नसल्याची माहिती मध्य रेल्वेचे माहिती अधिकारी स्वप्नील निला यांनी दिली.

जखमी व्यक्तीची माहिती खालील प्रमाणे:

१) श्री. शिवा गवळी (पुरुष २३ वर्ष/यांची प्रकृती चिंताजनक असल्याने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथून ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.)



२) आदेश भोईर ३) रिहान शेख ४) अनिल मोरे ५) तुषार भगत ६) मनीष सरोज ७) मच्छिंद्र गोतारणे ८) स्नेहा धोंडे ९) प्रियंका भाटिया

मृत्यू झालेल्या व्यक्तींची माहिती खालील प्रमाणे:

१ ) राहुल संतोष गुप्ता (२८ ) रा. दिवा, २) सरोज केतन (२३ ) रा. उल्हासनगर ३) मयूर शाह (४४ ) ४) मच्छीद्र मधुकर गोतरणे, वय-३१ (पोलीस कॉन्स्टेबल)

अपघातानंतर मध्य रेल्वेचे महत्त्वाचे निर्णय

१. नवीन गाड्यांमध्ये ऑटोमेटिक डोअर क्लोजर असेल. २. सध्याच्या लोकल ट्रेन्सनाही ऑटोमेटिक डोअर लावण्यासंदर्भात विचार केला जाईल. ३. कल्याण कसारापर्यंत तिसरी आणि चौथी लाईन तर कुर्लापर्यंत पाचवी आणि सहावी लाईन नियोजित ४. ठाणे ते सीएसएमटी सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करणार ५. सरकारी आणि खासगी कार्यालयांनी एकच ऑफिस टाईम न ठेवता वेगवेगळे इन-आऊट टाईम ठेवावे

दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान लोकलमधून एकूण ८ प्रवासी खाली पडून झालेल्या दुर्घटनेत काही जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींना तातडीने शिवाजी हॉस्पिटल आणि ठाणे सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्थानिक प्रशासन समन्वय साधून आहे. जखमींना लवकर आराम मिळावा, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. ही घटना नेमकी कशामुळे घडली, याची चौकशी रेल्वे विभागाने सुरू केली आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुंबईतील रेल्वे अपघाताची घटना दुर्दैवी आहे. या देशात माणसांची किंमत नाही. मुंबईतील रेल्वे कशी चालते हेच जगाला आश्चर्य आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली. तर, मुंबईत नीट रस्ते नाहीत, पार्कींग व्यवस्था नाही. केवळ रेल्वेपुरता हा विषय नसून शहरांचा विचका झाला आहे, अशा शब्दात राज यांनी रेल्वे अपघातावर आपले मत मांडले. मुंबईसह मेट्रो शहरात उंच इमारती उभ्या राहत आहेत, रस्ते नाहीत, लोकं वाढल्याने पार्किंगची व्यवस्था नाही. आग लागली तर बंब जायला वेळ नाही, बाहेरून येणारे लोंढे आहेत. कोण येतंय, कोण जातंय हे कळत नाही. मुंबईत मोनरेल, मेट्रो आहे. कोण काय वापरताय हे कोणी बघत नाही. शहर म्हणून कोणी बघायला नाही. त्यामुळे, केंद्र सरकारने रेल्वेच्या स्थितीकडे लक्ष दिलं पाहिजे, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली.

# राज्यातील पहिल्या महसूल लोक अदालतीचे उद्‌घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : नागपूर जिल्ह्यात महसूल विभागाला अत्याधुनिक बहुउद्देशीय (मल्टिपर्पज) वाहने देण्याचा निर्णय यापूर्वी शासनाने घेतला असून राज्यातील पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण महसूली विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणीदेखील यावर्षी अशी वाहने महसूल विभागाला देण्यात येतील, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

राज्यात पहिल्यांदाच पुणे जिल्ह्यात आयोजित केलेल्या महसूल लोक अदालतीच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार भीमराव तापकीर, बापूसाहेब पठारे, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, पक्षकार, वकील यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

**महसुली विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी महसूल विभागाला बहुउद्देशीय वाहने : उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा**

अधिकाऱ्यांकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असताना त्यांनाही पायाभूत सुविधा पुरविल्या पाहिजेत, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, त्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात सर्व विभागीय आयुक्तालयांच्या ठिकाणी आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर जिल्ह्यांतील महसूल विभागाला वाहने उपलब्ध करून दिली जातील.

आजच्या महसूल अदलतीत जवळपास ११ हजार महसूली दावे तडजोडीने निकाली निघणार असल्याने महसूल विभाग आणि न्याय व्यवस्थेवरीलही ताण कमी होणार आहे. पुढील अनेक वर्षे चालणारे खटले थांबणार असून त्यातून जनतेच्या आणि प्रशासनाच्या वेळेची, पैशाची आणि श्रमाची बचत होणार आहे. वाद संमतीने किंवा तडजोडी मिटल्याने गावातील भांडणे संपतील, जमिनीच्या वादामुळे कलुषित झालेली मने स्वच्छ होतील. घरात, गावात शांततेचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होईल. उर्वरित २० हजार दावेही अशा महसूल अदालतीचे आयोजन करुन तडजोडीने निकाली काढावेत, असेही ते म्हणाले.

प्रशासन आपली जबाबदारी बजावत असताना जे गुन्हेगारीवृत्तीने काम करतात अशांविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मकोका) (पान २ वर...)

**मुंब्रा अपघातानंतर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतली बैठक**

# मुंबईकरांसाठी 'लोकल'च्या तीन नव्या डिझाईन; २०२६च्या सुरुवातीला येणार सेवेला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील आजच्या लोकल दुर्घटनेनं मुंबईकरांच्या जीवाचा प्रश्न नव्याने चिंतेत आला आहे. मुंबई, मुंबई लोकल आणि गर्दी यावर उपायसंदर्भात चर्चा घडत आहेत. मुंबईत दररोज ७ प्रवासी लोकलमधून पडून मृत्यूमुखी पडत असल्याचे आकडेवारीवरुन समोर आलं आहे. त्यातच, आज मुंब्रा येथे झालेल्या दुर्घटनेत १३ प्रवासी ट्रेनमधून पडले असून ८ जणांनी आपला जीव गमावल्याने राजकीय नेते व प्रवासी संघटनाही आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी देखील या दुर्घटनेवर प्रतिक्रिया देताना, बंद दरवाजाच्या लोकलचा पर्याय सूचवला आहे. तर, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी बंद दरवाजाच्या लोकल पर्याय नसून त्याने जीव गुदमरुन लोकं मरतील, असेही त्यांनी म्हटलं. त्याच, अनुषंगाने आज रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत मुंबईतील लोकल ट्रेनच्या अनुषंगाने चर्चा केली.

मुंबईतील मुंब्रा लोकल दुर्घटनेनंतर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी तातडीची महत्त्वाची बैठक घेऊन मुंबईतील लोकल ट्रेन व गर्दीसंदर्भाने चर्चा केली. त्यामध्ये, मुंबईतील लोकल ट्रेनला दरवाजे असावेत की नसावे यावर प्रामुख्याने चर्चा झाली असून तीन पर्याय समोर आले आहेत. रेल्वेमंत्री आणि रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या टीमसह बैठकीतून चर्चा व संवाद साधला. मुंबईत धावणाऱ्या नॉन एसी लोकल ट्रेनला ऑटोमॅटिक दरवाजे असावेत की नसावेत याच अनुषंगाने बैठकी महत्त्वाची चर्चा झाली. त्यावर, येथील लोकल ट्रेनला स्वयंचलित दरवाजे बसवल्यास ट्रेनमधील प्रवाशांचा दम गुदमरण्याची शक्यता आहे. कारण, ट्रेनचे दरवाजे बंद झाल्यानंतर व्हेंटीलेशनचा सर्वात मोठा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यामुळे, हवा आतमध्ये येण्यास आणि बाहेर जाण्यास मोठा अडथळा निर्माण होईल, असा सूर बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांकडून समोर आला. त्यानंतर, नॉन एसी लोकल ट्रेनसाठी नव्याने बनविण्यात येणाऱ्या ट्रेनच्या मॉडेलमध्ये अशी व्यवस्था करण्यात यावी, ज्याने व्हेंटीलेशनची समस्या येणार नाही, असा निर्णय बैठकीत झाला. त्यानुसार, मुंबई लोकल ट्रेनसाठी तीन नवीन डिझाईन बनविण्यात येणार आहेत.

**रेल्वेमंत्र्यांसोबत आज झालेल्या बैठकीनंतर नव्याने येणारी ही मॉडेल ट्रेन नोव्हेंबर २०२५ पर्यंत तयार होणार आहे. आवश्यक त्या निरीक्षण व चाचणी, प्रमाणानंतर जानेवारी २०२६ पासून ही लोकल ट्रेन प्रवाशांच्या सेवेत सुरू होईल. मुंबई उपनगरीय प्रवासी वाहतुकीसाठीच हे मॉडेल बनविण्यात येणार असून सध्या धावणाऱ्या २३८ एसी ट्रेनशिवाय हे नवं मॉडेल मुंबईकरांसाठी असणार आहे.**

मुंबई लोकलसाठी तीन नवीन डिझाईन १. लोकल ट्रेनच्या दरवाज्यामध्ये लूव्हर्स म्हणजे हवा खेळती राहणाऱ्या पट्ट्या बसवण्यात येणार, त्यामुळे व्हेंटीलेशन हवा खेळती राहू शकेल. २. रेल्वे डब्ब्याच्या छतावर व्हेंटीलेशन युनिट्स बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे, बाहेरुन ताजी हवा लोकलच्या डब्ब्यात येऊ शकेल. ३. लोकल ट्रेनच्या कोचमध्ये वेस्टीब्यूल्स बसविण्यात येतील, ज्याने एका कोचमधून प्रवासी दुसऱ्या कोचमध्ये सहजपणे जाऊ शकेल. त्यातून ट्रेनमधील गर्दी स्वाभाविकपणे मोकळी होईल.



## संपादकीय....

### जीव टांगणीला

मुंबईतील मुंब्रा लोकल दुर्घटनेनंतर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी तातडीची महत्त्वाची बैठक घेऊन मुंबईतील लोकल ट्रेन व गर्दीसंदर्भाने चर्चा केली. त्यामध्ये, मुंबईतील लोकल ट्रेनला दरवाजे असावेत की नसावे यावर प्रामुख्याने चर्चा झाली असून तीन पर्याय समोर आले आहेत. रेल्वेमंत्री आणि रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या टीमसह बैठकीतून चर्चा व संवाद साधला. मुंबईत धावणाऱ्या नॉन एसी लोकल ट्रेनला ऑटोमॅटिक दरवाजे असावेत की नसावेत याच अनुषंगाने बैठकी महत्त्वाची चर्चा झाली. त्यावर, येथील लोकल ट्रेनला स्वयंचलित दरवाजे बसवल्यास ट्रेनमधील प्रवाशांचा दम गुदम रण्याची शक्यता आहे. कारण, ट्रेनचे दरवाजे बंद झाल्यानंतर व्हेंटीलेशनचा सर्वात मोठा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यामुळे, हवा आतमध्ये येण्यास आणि बाहेर जाण्यास मोठा अडथळा निर्माण होईल, असा सूर बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांकडून समोर आला. त्यानंतर, नॉन एसी लोकल ट्रेनसाठी नव्याने बनविण्यात येणाऱ्या ट्रेनच्या मॉडेलमध्ये अशी व्यवस्था करण्यात यावी, ज्याने व्हेंटीलेशनची समस्या येणार नाही, असा निर्णय बैठकीत झाला. त्यानुसार, मुंबई लोकल ट्रेनसाठी तीन नवीन डिझाईन बनविण्यात येणार आहेत. मुंबई, मुंबई लोकल आणि गर्दी यावर उपायसंदर्भात चर्चा घडत आहेत. मुंबईत दररोज ७ प्रवासी लोकलमधून पडून मृत्यूमुखी पडत असल्याचे आकडेवारीवरुन समोर आलं आहे. त्यातच, आज मुंब्रा येथे झालेल्या दुर्घटनेत १३ प्रवासी ट्रेनमधून पडले असून ८ जणांनी आपला जीव गमावल्याने राजकीय नेते व प्रवासी संघटनाही आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. मुंबई लोकलसाठी तीन नवीन डिझाईन. लोकल ट्रेनच्या दरवाज्यामध्ये लूव्हर्स म्हणजे हवा खेळती राहणाऱ्या पट्ट्या बसवण्यात येणार, त्यामुळे व्हेंटीलेशन हवा खेळती राहू शकेल. रेल्वे डब्ब्याच्या छतावर व्हेंटीलेशन युनिट्स बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे, बाहेरुन ताजी हवा लोकलच्या डब्ब्यात येऊ शकेल. लोकल ट्रेनच्या कोचमध्ये वेस्टीब्यूल्स बसविण्यात येतील, ज्याने एका कोचम धून प्रवासी दुसऱ्या कोचमध्ये सहजपणे जाऊ शकेल. त्यातून ट्रेनमधील गर्दी स्वाभाविकपणे मोकळी होईल. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील आजच्या लोकल दुर्घटनेनं मुंबईकरांच्या जीवाचा प्रश्न नव्याने चिंतेत आला आहे.

# जागरूक शेतकरी - सुरक्षित फवारणी !




शेती करताना कीड नियंत्रणासाठी किटकनाशकांचा वापर अपरिहार्य असतो. मात्र त्याचा वापर करताना शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही, तर याचे दुष्परिणाम आरोग्यावर होऊ शकतात. अनेकदा फवारणी करताना साध्या चुकांमुळे विषबाधा होऊन अपघात किंवा आजार उद्भवतात. त्यामुळे किटकनाशके फवारण्यापूर्वी, फवारताना आणि फवारणीनंतर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे.

फवारणी करण्याआधी वापरण्यात येणाऱ्या रसायनाच्या बाटलीवरील लेबल, सूचना पत्रक नीट वाचावे. त्या प्रत्येक रासायनाच्या विषारीपणाची पा-तळी वेगळी असते. यासाठी बाटल्यांवर लाल, पिवळा, निळा आणि हिरवा अशा रंगाचे त्रिकोणी चिन्ह असते. लाल रंग हे अत्यंत विषारी रसायन दर्शवते. या रंगांच्या आधारे निरक्षर व्यक्तीलाही त्या किटकनाशकाचे स्वरूप लक्षात येते.

फवारणीसाठी वापरण्यात येणारे यंत्र हे योग्य स्थितीत असावे. पंपाचे नोझल गळके असेल तर त्याचा वापर करणे टाळावे. तणनाशकासाठी वापरलेला पंप कीटकनाशकासाठी वापरू नये. मिश्रण तयार करताना सुरुवातीला थोड्या पाण्यात भुकटी मिसळून मग गरजेनुसार पाणी टाकावे. हे करताना हातात हातम ोजे व तोंडाला मास्क लावणे आवश्यक असते. शरीर झाकलेले राहील अशा प्रकारचे कपडे वापरावेत. डोक्यावर कापड, पायात बूट आणि पूर्ण बाह्यांचे शर्ट, पायजमा वापरणे फायदेशीर ठरते.

फवारणी करताना वाऱ्याच्या दिशे-नेच फवारणी करावी. पावसाच्या वेळी किंवा पाऊस होण्याची शक्यता असताना फवारणी करू नये. फवारणीनंतर लगेच शेतात प्रवेश करणे टाळावे. फवारणी करत असताना खाणे, पिणे किंवा धूम्रपान करणे टाळावे. एक दिवसात सलग ८ तासांपेक्षा जास्त फवारण-ीचे काम करू नये आणि उपाशीपोटी फवारणी करणे आरोग्यदृष्टीने धोकादायक असते. सकाळी न्याहारीनंतरच हे काम करावे.

फवारणी झाल्यावर हात, पाय, चेहरा आणि इतर अंग साबणाने स्वच्छ धुवून घ्यावा. वापरलेले कपडे वेगळे ठेवावेत. वापरलेले साहित्य स्वच्छ करून सुकवून सुरक्षित स्थळी ठेवावे. हे साहित्य विहिरी, नदी किंवा ओढ्याजवळ धुणे टाळावे. वापरलेले पाणी पडिक जागी टाकावे. रिकाम्या बाटल्या जमिनीत पुराव्यात.

विषबाधा झाल्यास थोड्याच वेळात काही लक्षणे दिसून येतात - जसे की चक्कर येणे, उलटी होणे, डोळ्यांतून पाणी येणे, अंगावर चट्टे उठणे, डोळे अंधुक दिसणे, स्नायूंमध्ये वेदना होणे, किंवा बेशुद्ध होणे. अशी लक्षणे दिसताच रुग्णास त्वरित नजीकच्या दवाखान्यात नेणे आवश्यक आहे. डॉक्टरांना नेमके कोणते किटकनाशक वापरले गेले होते, किती प्रमाणात आणि किती वेळापूर्वी हे घडले, याची माहिती दिल्यास उपचार अधिक योग्य प्रकारे करता येतात.

विषबाधा झाल्यावर रुग्ण पूर्ण शुद्धीत असेल तरच त्याला उलटी करण्यास प्रवृत्त करावे. अन्यथा तसे करू नये. कधीकधी प्राथमिक उपचार म्हणून कोळशाची भुकटी पाण्यात मिसळून दिली जाते. परंतु हेही डॉक्टरांच्या म ार्गदर्शनानुसारच करावे.

शेतीच्या आधुनिक काळात रसायनांचा वापर अपरिहार्य असला, तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेणे हे शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने किटकनाशक वापरताना योग्य ती दक्षता घ्यावी, यासाठीच ही माहिती सर्वांना समजून घेणे गरजेचे आहे.

**संकलन - युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**जळगाव**



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते देशातील पहिल्या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याचा शुभारंभ

पुणे : उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याहस्ते देशातील पहिल्या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याचा शुभारंभ हडपसर येथे करण्यात आला.

यावेळी आमदार चेतन तुपे, पुणे म हानगरपालिकेचे सहायक आयुक्त बाळासाहेब ढवळे, युनिव्हर्सल निमल वेल्फ ेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. हनुमंत शेळके, सचिव डॉ. स्वाती शेळके आदी उपस्थित होते.

सन २०३० पर्यंत रेबीज निर्मूलन करण्याचे ध्येय

डॉ. हनुमंत शेळके व डॉ. स्वाती जोगदंड शेळके या दाम्पत्याने २००९ साली बीड जिल्ह्यातून युनिव्हर्सल निमल वेल्फेअर सोसायटीची स्थापना केली. सन २०३० पर्यंत रेबीज निर्मूलन करण्याचे ध्येय समोर ठेऊन हे रुग्णालय सुरू केले आहे. ग्रामीण भागात श्वानांची वाढती संख्या, श्वानदंशामुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका व त्यावर उपाय योजना राबविण्यासाठी उपलब्ध असलेले व्यवस्था, कर्मचारी राहण्यासाठी गैरसोय या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी फिरता दवाखाना सुरू केला आहे. या रुग्णालयाच्या माध्यम ातून राज्यातील विविध भागात पशुवैद्यकीय सेवा देत आहेत.

महिन्याला ५०० शस्त्रक्रिया करण्याची क्षमता

फिरते पशुवैद्यकीय रुग्णालयाचे क्षेत्रफळ सुमारे २ हजार चौरस मीटर आहे. पहिल्यामजल्यावर १० कर्मचारी राहण्यासाठी व्यवस्था, म हिन्याला ५०० शस्त्रक्रिया करण्याची क्षमता, ज्यामध्ये १०० कुत्र्यांना ठेवण्याची सुविधा, ऑपरेशन थिएटर, ओपीडी, आणि कन्व्हर्टेबल कॉन्फरन्स रूम, किचन, अभिलेख कक्ष, चर्चासत्र कक्ष व वातानुकूलित, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, सोलर पॅनलद्वारे वीज निर्मिती, ओपीडी, लसीकरण, आपत्कालीन उपचार, नसबंदी आदी सुविधा उपलब्ध आहेत.

# राज्यातील पहिल्या महसूल लोक अदालतीचे उद्घाटन

(पान १ वरून...) कारवाई केली पाहिजे. त्यादृष्टीने कायद्यात बदल करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

शासनाचे जे विभाग अधिकाधिक महसूल शासनाच्या तिजोरीत आण-तील त्यांना त्याप्रमाणात प्रोत्साहन निधी देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती श्री. पवार यांनी दिली.

राज्य शासनातर्फे विविध भव्य शासकीय इमारती उभारण्यात येत आहेत. यशदा येथे मसुरीच्या धर्तीवर राज्यातील अधिकाऱ्यांसाठी देशात इतर कोणत्याही राज्यात नसेल असे भव्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १२० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहितीदेखील उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

पुण्यात सुरू केलेला महसूल लोकअदालत उपक्रम राज्यात राबविणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

पुणे जिल्ह्याने सुरू केलेल्या महसूल लोक अदालतीमुळे महसुली दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात निकाली निघणार आहेत. त्यामुळे ही सर्वसामान्यांना न्याय देणारी महसूल लोकअदालतीची मोहीम यापुढे राज्यभरात राबविली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.

पुणे येथे भरलेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ६ विभागीय आयुक्तांना महसूल विभागाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यात नायब तहसील ते मंत्रालय पातळीवर तीन ते साडेतीन लाख महसुली दावे प्रलंबित आहेत. ही मोठ्या प्रमाणावरील प्रकरणे कशी संपतील यासाठी महसूल लोक अदालतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच पक्षकार आणि वकीलांचे सहकार्य घेण्यात येईल.

महसूल विभाग हा राज्याचा चेहरा आहे. वेळ आणि पैशाची बचत, मैत्रीपूर्ण न्यायव्यवस्था निर्माण करण्याकरिता, स्वखुशीने तडजोड निर्माण करण्याची व्यवस्था, महसूल व्यवस्थेवरील ताण कमी करणे आदी काम या महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून झाले आहे. महसूल विभागात मोठ्या प्रम ाणात पारदर्शकता आणण्यात येत आहे. विभागातील मागील २५ वर्षापासून प्रलंबित असलेले विषय शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या माध्यम ातून पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्याने सादरीकरण केलेल्या बाबींच्या अनुषंगाने विविध शासन निर्णय काढण्यात येणार असून त्यामुळे राज्याच्या महसुलात २० हजार कोटींची वाढ होईल. ई-फेरफार प्रणालीच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकाचे राज्यभरात अभिनंदन झाले असून या परिपत्रकाप्रम ाणे अंमलबजावणीसाठी शासन निर्णय करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

राज्य शासनाने नवीन वाळू धोरण आणले असून 'एम-सँड'म्हणजेच दगडापासून केलेली वाळू बांधकामात वापरली जाईल. त्यादृष्टीने शासकीय, खासगी जागा उपलब्ध करून देऊन क्रेशर उभारण्यात येतील. महाखनिजच्या माध्यमातून ऑनलाईन संनियंत्रण करून मागणीप्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. जेणेकरून बुडणारा म हसूल वाचण्यासह नदीच्या वाळूवरुन होणारे गैरप्रकार बंद होणार आहे.

'छत्रपती शिवाजी महाराज म हाराजस्व' अभियानासाठी ज्याप्रमाणे जिल्हा वार्षिक योजनेतून निधी दिला त्याप्रमाणे महसूल लोक अदालतीला द्यावा, महसूल विभागाला अत्याधुनिक मल्टीपर्पज वाहने मिळाल्यास विभागाच्या कामाला गती येईल, असेही ते म्हणा-ले.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी यांनी महसूल लोक अदालतीच्या आयोजनाम ागील भूमिका सांगितली. ते म्हणाले राज्यातील मोठ्या प्रमाणात प्रलंबित महसूल प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने पुढाकार घेऊन ही लोक अदालत आयोजित केली आहे. जिल्ह्यात मंडल अधिकारी, तह-सीलदार, उपविभागीय अधिकारी, अपर जिल्हाधिकारी स्तरावर ३१ हजारावर महसूली प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ११ हजार ५८९ प्रकरणे या अदालती मध्ये ठेवण्यात आली आहे. यापुढेही दर तीन महिन्यांनी महसूल लोक अदालती-चे आयोजन करून दाव्यांची संख्या ३१ हजारावरून १० हजारापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ईक्यूजे कोर्ट, ई- हक्क प्रणाली, ई- फ ेरफार नोंदणी, पानंद रस्ते खुले करण्याची मोहीम, नाविन्यपूर्ण असा सेवादूर उपक्रम आदींची माहिती दिली. महाखनिज व बांधकाम परवानगी एकात्मिक प्रणाली-वर आणल्यामुळे १५० कोटी रुपयांच्या महसूलात वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महसूल लोक अदाल-तीत निकाली निघालेल्या प्रकरणातील पक्षकारांना प्रातिनिधीक स्वरुपात निकालपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी वकील आणि पक्षकार यांनी प्रातिनिधीक स्वरुपात मनोगत व्यक्त केले.

अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी आभार व्यक्त केले.

## दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान झालेल्या दुर्घटनेतील मृतांना मुख्यमंत्र्यांकडून श्रद्धांजली

मुंबई : दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान लोकलमधून एकूण आठ प्रवासी खाली पडून झालेल्या दुर्घटनेत काही जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. या दुर्घटनेतील मृतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. जखमींना तातडीने छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल, कळवा आणि ठाणे सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कुल माणगाव च्या नवीन इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# कोकणाचा जलदगतीने विकास करण्यासाठी रस्ते, महामार्ग उभारणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड (जिमाका) : नैसर्गिक सौंदर्याने समृद्ध कोकणाचा जलदगतीने विकास व्हावा यासाठी रस्ते व म हामार्ग उभारून प्रवासाचा वेग कमी करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आह. प्रवासाचा वेग कमी करण्याची गरज लक्षात घेऊन मुंबई गोवा महाम ार्ग पूर्ण करणे, मुंबई सिंधुदुर्ग ॲक्सेस कंट्रोल रस्ता बरोबरच अनेक रस्त्यांची उभारणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई स्कुल माणगाव च्या नवीन इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, रोहयो मंत्री भरत गोगावले, खासदार सुनील तटकरे, आमदार महेंद्र दळवी, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, माणगाव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड राजीव साबळे, संचालक अनिकेत तटकरे यांसह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणा-ले कोकणातील विकासाला गती देण्यासाठी येथील प्रवासाचा कालावधी कमी करण्याची गरज आह. यासाठी राज्य शासनाने कोस्टल महामार्गावरील ९ खाडी पुलांचे काम सुरू केले आहे. तसेच मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. मुंबई ते सिंधुदुर्ग ऍक्सेस कंट्रोल रस्ता उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मुंबई गोवा महामार्ग वर माणगाव येथे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी माणगाव बायपासचे काम लवकरच मार्गी लावण्यात येईल. कोकणातील लोकांना स्थानिक ठिकाणी रोजग-ार उपलब्ध करून देण्यासाठी मोठे प्रकल्प या ठिकाणी उभारण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्य शासन अनेक लोकांभिमुख प्रकल्प राबवून विकासाला चालना देत असल्याचेही श्री शिंदे यांनी सांगितले.



राज्य शासनामार्फत महिला सक्षमकरणासाठी सुरु करण्यात आ-लेली लाडकी बहीण योजना किती ही अडचणी आल्या तरी बंद करण्यात येणार नाही अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाने सीबीएसई शाळा सुरु करून ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली आहे ही कौतुकास्पद बाब आह. या शाळेला मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे यांचे नाव दिले याचा विलक्षण आनंद आह. मातोश्री गंगुबाई या शिक्षणासाठी खुप आग्रही होत्या. परिस्थितीमुळे मी शिक्षण घेऊ शकलो नव्हतो. परंतु नंतरच्या आयुष्यात मी पदवी आणि पुढील शिक्षण घेतले. तसेच मुलगा उच्चविद्याविभुषित आह याचे समाधान असल्याचेही श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

आरोग्य आणि शिक्षण ही दोन्ही महत्वाची खाती आवर्जून स्वतः कडे घेतली असून त्या माध्यमातून अनेक लोकांभिमुख निर्णय घेण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

मराठीचा सन्मान राखायलाच हवा, मात्र जागतिक स्पर्धेला तोंड द्यायचे तर इंग्रजी देखील यायला हवे, त्याच दृष्टिकोनातून पालकांची मागणी पूर्ण करण्यासाठी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळामार्फत ही सीबीएसई शाळा सुरू करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भविष्यात या शाळेतून अनेक उत्तमोत्तम विद्यार्थी घडावेत अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी माणगाव शिक्षण प्रसारक संस्थेच्या कामाचा आढावा घेऊन संस्थेच्यापुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

खासदार सुनील तटकरे यांनी संस्थेने माणगावात विविध शैक्षणिक दालने सुरू करून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे सर्व सामान्य आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना माणगा-वातच उच्च शिक्षण घेता येत आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना रोजग-ाराची संधी उपलब्ध होतील असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे अध्यक्ष ॲड राजीव साबळे यांनी केले. कार्यक्रमाला शैक्षणिक क्षेत्रा-तील विविध मान्यवर, पदाधिकारी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पत्रकारांचे समाजातील काम आदर्शवत : केंद्रीय सहकार व नागरिक विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जीवन गौरव व पत्रकारिता पुरस्कार वितरण समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : निःस्वार्थीपणे सतत २४ तास काम करणारा पत्रकार हा खर्या अर्थाने लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. गुणवत्तापूर्ण माहिति समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसार माध्यमातून होत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेतपत्रकारांनी चांगले काम करून समाजात चांगला आदर्श निर्माण केला असल्याचे प्रतिपादन केंद्रीय सहकार व नागरिक विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जीवन गौरव व पत्रकारिता पुरस्कार वितरण समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल बाल-ाजी सरोवर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास पालकमंत्री तथा ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आमदार देवेंद्र कोठे, मराठी पत्रकार संघाचे सल्लागार राकेश टोळ्ये, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशअध्यक्ष मनीष केत, डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्यासह जिल्ह्यातील विविध दैनिकांचे संपादक, प्रसारमाध्यम प्रतिनिधी तसेच मान्यवर उपस्थितीत होते.

यावेळी राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणा-ले, सामाजिक विकासात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवण्यापासून ते प्रत्येक घटकाला सामाजिक न्याय मिळवण्यासाठी पत्रकारांनी सातत्यानेच भरीव काम केले आहे. कोविड सारख्या काळात सर्व नागरिक घरात बसून होते. या काळात पत्रकारांनी रस्त्यावर उतरून काम केले आहे. त्यांनी केलेले काम समाजासमोर येते. त्यामुळे पत्रकारांचा सन्मान होणे गरजेचे आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी केलेले काम महाराष्ट्रभर पोचलेले आहे त्यामुळे त्यांचा सन्मान हा कार्यक्रमाची शोभा वाढविणारा आहे असे गौरवउद्गार केंद्रीय राज्यमंत्री श्री मोहोळ यावेळी काढले.

**यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांना जीवन गौरव तर एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, दैनिक सकाळचे सह.संपादक सिद्धराम पाटील झी २४ तास-चे ब्युरोचीफ प्रताप नाईक, टीव्ही नाईनचे ब्युरोचीफ योगेश बोरसे, न्यूज एटीन लोकमतचे प्रतिनिधी रा-हुल झोरी यांना तसेच एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक पुरस्कार सक्रिय पत्रराज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.**

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, चांगले काम करणाऱ्यांची दखल समाज घेत असतो. वेगवेगळे पुरस्कार देऊन त्यांचा गौरवही केला जात असतो. पुरस्कारामुळे पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तीचा गौरव होतो, तर इतरांना चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. योग्य व्यक्तीला पुरस्कार दिल्याने पुरस्काराची उंची वाढते असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच पत्रकारांबरोबर आपले नेहमीच जिव्हाळ्याचे संबंध राहिले असून आपल्या यशस्वी वाटचालीत पत्रकारांची मोलाची साथ लाभली आहे. पत्रकारांच्या आवश्यक सुविधेसाठी कायम प्रयत्नशील राहू असे पालकमंत्री श्री गोरे यांनी यावेळी सांगितले.




प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळ-शास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प-हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत यांनी पत्रकारांना आधिस्विकृती पत्रिका देण्याची संख्या वाढवावी. सोलापूर विमानतळावरून हैदराबाद व तिरुपती विमान सेवा सुरू करावी अशी मागणी प्रस्ताविकात केली.




## गरूड फाउंडेशनच्या वतीने प्रा. रविंद्र चाटे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : माहत्मा ज्योतीबा फ ुले कनिष्ठ महाविद्यालय लाखनवाडा तालुका खामगाव जिल्हा बुलढाणा येथे कार्यरत असलेले प्रा.रविंद्र चाटे यांना आयोजित गरूड फाउंडेशन अहमदनगर जिल्हा राहुरी.यांच्या वतिने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक' पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रा . रविंद्र गुलाबराव चाटे. यांचे मुळ गाव माँ जिजाऊ चे माहेर घर अस-लेले मातृतिर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव आहे .प्रा.रविंद्र चाटे यांना शाळेत शिकत असताना त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त-ाने शाळेत होत असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांत त्यांना बालवयात भाषणे करण्याची आवड असाची . त्यातुन मिळत गेलेले स्टेज डेरींग .ते हळूहळू सुत्रसंचलन करायचे व कवि लेखक सुध्दा आ-हेत.तसेछ छत्रपती शिवाजी म हाराज. माहत्मा.फुले. राजश्री शाहू महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून युवक जन सामान्या प्रर्यंत पोहचविण्याचे काम करतात. प्रा रविंद्र चाटे .यांची बुलढाणा जिल्हा भर व्याख्या ते म्हणुन ओळख आहे. गरुड फाउंडेशन ने त्यांच्या कार्याची दखल घेत प्रा.रविंद्र गुलाबराव चाटे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने स्मृती चिन्ह सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# सामाजिक न्याय विभागाचे विविध पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, राज्यातील एकूण १३० पुरस्कारार्थ्यांची निवड या पुरस्काराकरिता करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ९० व्यक्ती व ४० संस्थांचा समावेश आहे. या पुरस्कारांचे वितरण दिनांक १० जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणार आहे. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ तसेच अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार या विविध पुरस्कारांची शासनाने घोषणा केली आहे. या पुरस्कारासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. पुरस्कारासाठी निवड झालेल्या व्यक्तींना मुंबई येथे कार्यक्रम ठिकाणी घेऊन येण्यासाठी संपर्क अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. पुरस्कारार्थी यांची निवास,भोजन व मुंबई दर्शनाची व्यवस्था शासनाच्या वतीने करण्यात आली आहे. राज्यातील विभागाचे समाज कल्याण अधिकारी प्रत्यक्ष पुरस्कारार्थी यांच्या घरी जाऊन त्यांचे अभिनंदन करीत आहेत.

**१० जून रोजी मुंबईत पुरस्कार वितरण सोहळा**

जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कार प्राप्त व्यक्ती व संस्था याची माहिती पुढील प्रमाणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार ६१ व्यक्तीं -(प्रत्येकी ७५ हजार), व १० संस्था ( प्रती संस्था प्रत्येकी १ लाख) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार २७ व्यक्तीं (प्रत्येकी ७५ हजार ) व ६ संस्था ( प्रती संस्था प्रत्येकी १ लाख). कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार १ व्यक्तीं -(प्रत्येकी ५१ हजार ), व १ संस्था ( प्रती संस्था प्रत्येकी १ लाख ).संत रविदास पुरस्कार १ व्यक्तीं -(प्रत्येकी ५१ हजार), व १ संस्था ( प्रती संस्था प्रत्येकी १ लाख).शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक एकूण १४ संस्थेला ६ म हसुली विभागानूसार प्रत्येकी दोन संस्था ७.५० लाख सन्मानपत्र , मानपत्रासाठी चांदीचा स्क्रोल,स्मृतीचिन्ह , शाल, व श्रीफळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार ८ संस्था , राज्यस्तर ३ पुरस्कार प्रथम पुरस्कार ५ लाख, द्वितीय पुरस्कार ३ लाख व तृतिय पुरस्कार २ लाख विभागीय स्तरावर पुरस्कार संख्या ५, प्रत्येकी १ लाख याप्रमाणे राज्यातील ९० व्यक्ती व ४० संस्थांचा एकूण १३० पुरस्कारार्थ्यांची निवड या विविध पुरस्काराकरीता करण्यात आलेली आहे. या सर्व पुरस्कार वितरण सोहळयाचे नियोजन काटेकोर पद्धतीने होण्यासाठी विभागाचे प्रधान सचिव हर्षदिप कांबळे, समाज कल्याण विभागाचे आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी विविध बैठका घेऊन अधिकाऱ्यांना निर्देशित केले आहे. विभागाचे सहसचिव सोमनाथ बागुल,उपसचिव रविंद्र गोरवे, मुंबई समाज कल्याण प्रादेशिक विभागाचे उपायुक्त बाळासाहेब सोळंकी व त्यांच्या टीमकडून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत आहे.

# आदर्श लोकसंचलीत साधन केंद्र खोणी भिवंडी यांची वार्षिक सर्वसाधारण सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापित आदर्श लोकसंचलित साधन केंद्र खोणी, भिवंडी यांची ५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८.०५.२०२५ रोजी भिवंडी , अजयनगर शिवसेना भवन येथे कार्यक्रम संपन्न झाले, यावेळी वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गरजे महिला आर्थिक विकास महामंडळ ठाणे यांनी बचत गटातील महिलांना स्वतःच्या विकास कस करायचं, स्वतःच्या पायावर ऊभे रहाणे गरजेचे आहे. महिला आर्थिक, सामाजिक राजकीय दृष्टीने सक्षम झाली पाहिजे. अशा प्रकारे मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचं प्रमाणे आदर्श लोकसंचालित साधन केंद्राची खोणी या संस्थेच्या अध्यक्ष पदी सोनल रापटे व उपाध्यक्ष उर्मिला शिंगे यांची निवड केली तसेच सचिव म्हणून सरिता भगत व सदस्या ची निवड कार्यक्रमात करण्यात आली. त्याच प्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभे मध्ये उत्कृष बचत, उत्कृष ग्राम संघांचे, उत्कृष्ट सी आर पी समुदाय साधन व्यक्ती तसेच सहयोगिनी ज्योती जाधव, पद्मिनी जाधव यांचे गुणगौरव व सन्मान करण्यात आला. तसेच जिल्हा नियोजन ठाणे मार्फत मिळालेल्या रसवंती, पापड मशीन व कांडप मशीन चे गरजू महिलांना मशीनचे वाटप वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गर्जे, तालुका अभियान व्यवस्थापक पंढरी भला, हेमंत पाटील, आय सी आय सी आय बँकेचे अधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.




कार्यक्रमा मध्ये आदर्श लोकसंचालीत साधन केंद्राचा शाश्वत आराखडा २०२५-२०२६ चे वाचन करून मंजुरी घेण्यात आली. तसेच संस्थेच्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खर्चाचे सादरीकरण करून मंजूर घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे व्यवस्थापक सचिन स वाघचौरे यांनी केले. कार्यक्रम ाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

**कलगी-तुरा समाज उन्नती समन्वय समितीची सभा चिपळूण येथे संपन्न**

**अभयदादा सहस्त्रबुद्धे यांचे प्रतिपादन**

# शाहीरांनी लोककलेची अस्मिता टिकवणे ही आजच्या काळाची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : कलगीतुरा समाज उन्नती मंडळ समन्वय समितीची विशेष सभा रविवार दि.०८ जून २०२५ रोजी समितीचे अध्यक्ष अभयदादा सहस्रबुद्धे यांच्या परशुराम (चिपळूण) येथील निवासस्थानी यशस्वीरित्या संपन्न झाली.समन्वय समितीशी सलग्न मंडळाच्या सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी यावेळी उप-स्थिती दर्शवली आणि सभेला अनुसरून सांगोपांग चर्चा करण्यात आली. कलगीतुरा या आपल्या वैभवशाली परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रत्येक शाहिराने आपल्या पारंपरिक चौकटीला छेद न देता आपली कला





सादर करून या लोककलेचा लौकिक अधिक वाढेल यादृष्टीने प्रयत्न करणे अभिप्रेत आहे. सभेदरम्यान समन्वय समिती व मंडळाची ध्येयधोरणे आपण तंतोतंत पाळू असा लिखित शब्द देऊनही काही शाहीर स्वतःच्याच वचनाला बांधील न राहता या लोककलेच्या संस्कृतीशी प्रतारणा करताना निदर्शनास येत आहे,त्यांना वारंवार समज देऊनही अपेक्षित बदल दिसत नाही,त्यामुळे संबंधित शाहिरांवर कायम स्वरूपाची व ठोस कारवाई करण्यात यावी असा निर्णय समन्वय समितीच्या माध्यमातून घेण्यात आला. या लोककलेला शासन दरबारी न्याय मिळावा यासाठी समन्वय समिती व सलग्न सर्व मंडळे तसेच संबंधित पदाधिकारी सातत्याने पाठपुरावा करत आहेत, शासनाने आपल्या पदरात अपेक्षित अनुदान टाकावे यासाठी शासनाला अभिप्रेत असणारी लोककला सादर करणे आवश्यक आहे, पर्यायाने त्यासाठी काही तांत्रिक बदल करण्याची देखील गरज असल्याचे सभे दरम्यान नमूद करण्यात आले.उदाहरणार्थ आपल्या लोककलेचा उगम हा कलगी - तुरा या नावाने झाला आहे आणि त्यानुसार स्थ-ापन झालेली आपली मंडळे ही कलगीतुरा समाज उन्नती मंडळ या नावानेच नोंदणीकृत आ-हेत. शासनाच्या निकषानुसार कलगीतुरा याच नावाने या लोककलेचा प्रचार आणि प्रसार होणे गरजेचे आहे. आज-वर आपण शक्ती तुराअशा आशयाने या लोककलेशी निगडीत जाहिरात करत आलो आहोत.परंतु यापुढे शक्ती तुरा याऐवजी कलगीतुरा असा उल्लेख असणारी प्रचार फलक तयार करण्यात यावेत आणि तसाच उल्लेख आपल्या बोलण्यातून सुद्धा व्हावा अशी भूमिका आजच्या सभेत मांडण्यात आली आणि ती सर्वानुमते मान्य करण्यात आली. या लोककलेच्या समृद्धीसाठी आवश्यक ते चांगले बदल करण्यासाठी आपण प्रत्येक कलावंत सदैव बांधील आहोत आणि राहिले पाहिजे. सभेमध्ये येणाऱ्या हंगामात सोज्वळ आणि समाजप्रिय कार्यक्रम सादर व्ह-ावेत, शाहिरांनी आपल्या लोककलेची आणि स्वतः ची अस्मिता अबाधित ठेवून सादरीकरण करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.आणि संबंधित मंडळांनी व घराण्यातील वरिष्ठांनी आपापल्या शाहिरांना सूचना द्याव्यात असेही यावेळी सुचवण्यात आले.

सदर सभेसाठी समन्वय समितीचे विद्यमान अध्यक्ष अभयदादा सहस्त्रबुद्धे, सचिव सुधाकर मास्कर, उपाध्यक्ष चंद्रकांत गोताड, मोहन घडशी, मुंबई मंडळाचे अध्यक्ष अनंत तांबे समवेत इतर पदाधिकारी, देवरुख मंडळाचे अध्यक्ष शांताराम मालप आणि पदाधिकारी, चिपळूण मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग जंगम आणि पदाधिकारी तसेच लांजा मंडळाचे सन्माननीय पदाधिकारी उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन शाहीर शाहिद खेरटकर यांनी केले.

# ‘शिवसृष्टी’ निर्मितीसाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन रायगडावर उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जिमाका रायगड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार व आचार आदर्श मानून राज्य सरकारची वाटचाल सुरु आह. पाचाड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याची माहिती देणारी भव्य दिव्य शिवसृष्टी उभारली जाणार असून, त्यासाठी सरकारकडून सर्व प्रकारची मदत केली जाईल. अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज जेष्ठ शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी दुर्गराज रायगडवर मोठया उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योग मंत्री उदय सामंत, रोहयो मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री योगेश कदम, खा. श्रीरंग बारणे, आ. महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी किशन जावळे,पोलीस अधीक्षक आचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, यांच्यासह कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष नितिन पावळे आदी मान्यवर आणि मोठ्या संख्येने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले शिवभक्त उपस्थित होते.

सर्वप्रथम शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले ही पवित्र भूमी शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. ३५२ वर्षांपूर्वी जर शिवराज्याभिषेक झाला नसता, तर आज आपण इथे नसतो. त्यांच्या दूरदृष्टी मुळे स्वराज्याचा पाया घालण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांनी जात-पात, धर्म, वर्ण या पलीकडे जाऊन रयतेचे राज्य प्रस्थापित केले. त्यामुळे ते फक्त महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे राष्ट्रनायक आहेत. पाकिस्तान बाबत जी भूमिका प्रधानमंत्री मोदीजींनी घेतली आह त्यामागे देखील छत्रपती शिवाजी महाराज यांचीच प्रेरणा आह असेही त्यांनी सांगितले.

काळ कितीही पुढे गेला आणि आपण कितीही तंत्रज्ञानाच्या गोष्टी केल्या तरी शिवाजी महाराजांचा वारसा आपण कुणीच विसरू शकणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले राज्यशासनाने गडकोट किल्ले आणि मंदिरांचं जतन, संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आह.

छत्रपती महाराजांची, स्वराज्याची ओळख नव्याने करुन देण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन आपण पर्यटनाला चालना देतो आह. त्यासाठी भारत गौरव यात्रेच्या’ माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरु केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ट्रेनला आज हिरवा कंदील दाखवला असून या विशेष रेल्वे च्या माध्यमातून नागरिकांना ऐतिहासिक किल्ले आणि गडकोट पाहता येणार आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना राज्याचे रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी पेहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील ऑपरेशन सिंदूर मध्ये सहभागी वीर सैनिकांना मानवंदना दिली. त्यांनी शिवसृष्टीसाठी सरकारने मंजूर केलेल्या ५० कोटी रुपयांच्या निधीबाबत आराखडा तयार असून लवकरच काम सुरु होणार असल्याची माहिती दिली. वारा, पाऊस, ऊन याची तमा न बाळगता स्वखर्चाने रायगडावर येऊन दोन दिवस सतत सेवा करणाऱ्या सर्व शिवभक्तांचे त्यांनी आभार मानले. शिवराज्याभिषेक सोहळ्यात प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांना रायगड पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली. या सोहळ्याच्या निमित्ताने विविध शाहिरी कार्यक्रम, लोकनृत्ये, युद्धकला सादरीकरणे आणि मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक यामुळे रायगडावर शिवकाल अनुभवण्याचा अद्वितीय क्षण उपस्थितांना लाभला.

# ध्येय निश्चितीसाठी सर्वस्व पणाला लावावे : प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : गरिबीत शिक्षण घेताना परिश्रमपूर्वक अभ्यास केल्यास होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था पुढे येतात. स्पर्धेच्या युगात गुणवत्ता व कौशल्याच्या बळावर मोठ मोठी अधिकारपद प्राप्त होऊ शकतात म्हणून विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्याच्या प्राप्तीसाठी सर्वस्व पणाला लावावे असे प्रतिपादन कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी केले.



रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय मुला मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित केला होता त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, रोटरी क्लबचे सचिव आदर्श गोयदानी, खजिनदार अल्पेश साबू, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या परिस्थितीचा बाऊ करता कामाने. त्या परिस्थितीवर मात करून शिक्षण घ्यावे. मुलांनी उच्चशिक्षित बनावे. शिक्षणासोबत खेळात ही प्रावीण्य मिळवावे. शिक्षणानेच संपत्ती कमवता येते असे नाही याचे ज्वलंत उदाहरण रघुनाथ माशेलकर, बुद्धिबळ पटू गुकेश डोम्माराजू, राजस्थान रॉयल्सचा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी आदी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. शेवटी मान्यवरांच्या हस्ते ३० शालेय विद्यार्थ्यांना वह्या व पेनसेट भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले

# दिवा-मुंब्रा रेल्वे अपघातातील जखमींना मंत्र्यांची भेट, तातडीच्या उपचाराचे निर्देश; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून मृतांना श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकांदरम्यान झालेल्या रेल्वे प्रवासी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, राज्याचे जलसंपदा (तापी, विदर्भ आणि कोकण) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, डॉ.नरेश म्हस्के, आमदार रवींद्र चव्हाण, निरंजन डावखरे आणि राजेश मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची भेट घेवून विचारपूस केली. यावेळी त्यांनी ठाणे व कळवा येथील रुग्णालयांना जखमींवर तातडीने उपचार करण्याचे निर्देश दिले. तसेच, या कठीण प्रसंगात शासन पूर्णपणे जखमी व त्यांच्या नातेवाईकांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही दिली.

या हृदयद्रावक दुर्घटनेतील मृतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी मृतकांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी



असल्याचेही सांगितले.

या दुर्घटनेनंतर ठाणे जिल्हा प्रशासन संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याची माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे. प्रशासनाकडून बचावकार्य आणि जखमींना मदत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. ही घटना कशी घडली, याबाबत चौकशी सुरू असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने नुतन शापोआ अधिक्षक अंकुश शिंगडे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद धाराशिव चे शालेय पोषण आहार अधिक्षक म्हणून नव्यानेच लातूर येथून श्री अंकुश शिंगडे साहेब हे हे रुजु झाले. याबद्दल राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



शालेय पोषण आहार अर्थात प्रधानमंत्री पोषण योजना ही शासनाची महत्वाकांक्षी योजना असून तिची प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे.धाराशिव जिल्ह्यातील प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळेत यशस्वीपणे योजना राबविली जात आहे.मावळते अधिक्षक श्री.रामलिंग काळे यांनीही यासाठी प्रयत्न केले आहेत.याबद्दलही श्री काळे साहेब यांचा सत्कार करुन निरोप देण्यात आला.यापुढेही विद्यार्थी हित डोळ्यासमोर ठेवून सदर योजना राबविण्यात येणार असल्याचे यावेळी श्री अंकुश शिंगडे यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री.संतोष भोजने, जिल्हाध्यक्ष श्री अनंत फुलसुंदर, श्री चव्हाण सर, समाज कल्याण विभागाचे अधिक्षक आणि ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष श्री.सुधीर जाधवर हे उपस्थित होते.

# श्याम दौंडकर लिखित ‘धडपड भाग-३’ या पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : ज्येष्ठ पत्रकार श्याम दौंडकर लिखित धडपड भाग-३ या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात आयोजित पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आले.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे, आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामटे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले, धडपड भाग तीन या पुस्तकाचे लेखक श्याम दौंडकर यांची एक रिक्षा चालकापासून ते जिल्ह्यातल्या पत्रकारितेपर्यंतची वाटचाल नक्कीच खडतर होती. पत्रकार म्हणून त्यांनी अनेक वर्ष जिल्हा परिषद बीट सांभाळले असून त्यामुळे त्यांचा संपर्क वाढला, अनेक क्षेत्रातील लोकांशी त्यांचा संपर्क आला, जिल्ह्याचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या लेखणीतून समाजासमोर मांडले,



ग्रामीण भागातील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ग्रामीण भागाची जाण असलेले पत्रकार म्हणून श्री. दौंडकर यांच्याकडे बघितले जाते. पुस्तक लिहीत असताना त्यांनी कोणतेही बंधन स्वतःवर घातले नाही, असे ते म्हणाले.

धडपड भाग-३ या पुस्तकात दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या गाथा त्यांनी सर्वांच्या समोर ठेवण्याचा, उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत गरिबीतून ते पुढे आले असून त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर कष्टाच्या व संघर्षाच्या जोरावर पत्रकारितेसारख्या बुद्धिवंतांच्या क्षेत्रात स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. श्री. दौंडकर यांनी समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या लेखणीचा वापर केला असून त्यातून त्यांनी लोकांचे प्रेम आदर सन्मान मिळविला आहे. पुस्तक लिखाणाबद्दल त्यांना जिल्ह्याच्या जनतेच्या वतीने शुभेच्छा देऊन श्री. पवार यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांचे सुद्धा अभिनंदन केले. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या शेवटी धडपड भाग-३ पुस्तक देऊन मान्यवरांचा व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विशेष यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राजेंद्र खांदवे पाटील यांनी आभार व्यक्त केले.

**पुणे येथे महसूल परिषद**

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा**

# पुण्यात सुरू केलेला महसूल लोकअदालत उपक्रम राज्यात राबविणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे जिल्ह्याने सुरू केलेल्या महसूल लोक अदालतीमुळे महसूली दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात निकाली निघणार आहेत. त्यामुळे ही सर्वसामान्यांना न्याय देणारी महसूल लोकअदालतीची मोहीम यापुढे राज्यभरात राबविली जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.

पुणे येथे झालेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ६ विभागीय आयुक्तांना महसूल विभागाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने काही जबाबदाऱ्या दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यात मंत्रालय ते नायब तहसील पातळीवर मोठ्या प्रमाणावर म्हणजेच १३ लाखावर महसूली दावे प्रलंबित आहेत. ती प्रकरणे कशी संपतील यासाठी महसूल लोक अदालतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच पक्षकार आणि वकीलांचे सहकार्य घेण्यात येईल.




महसूल विभाग हा राज्याचा चेहरा आहे. वेळ आणि पैशाची बचत, मैत्रीपूर्ण न्यायव्यवस्था निर्माण करण्याकरिता, स्वखुशीने तडजोड निर्माण करण्याची व्यवस्था, महसूल व्यवस्थेवरील ताण कमी करणे आदी काम या महसूल लोक अदालतीच्या माध्यमातून झाले आहे. महसूल विभागात मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आणण्यात येत आहे. विभागातील मागील २५ वर्षापासून प्रलंबित असलेले विषय शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्याने सादरीकरण केलेल्या बाबींच्या अनुषंगाने विविध शासन निर्णय काढण्यात येणार असून त्यामुळे राज्याच्या महसूलात २० हजार कोटींची वाढ होईल. ई-फेरफार प्रणालीच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकाचे राज्यभरात अभिनंदन झाले असून या परिपत्रकाप्रमाणे अंमलबजावणीसाठी शासन निर्णय करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

राज्य शासनाने नवीन वाळू धोरण आणले असून ‘एम-सँड’म्हणजेच दगडापासून केलेली वाळू बांधकामात वापरली जाईल. त्यादृष्टीने शासकीय, खासगी जागा उपलब्ध करून देऊन क्रेशर उभारण्यात येतील. महाखनिजच्या माध्यमातून ऑनलाईन संनियंत्रण करून मागणीप्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. जेणेकरून बुडणारा महसूल वाचण्यासह नदीच्या वाळूवरुन होणारे गैरप्रकार बंद होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानासाठी ज्याप्रमाणे जिल्हा वार्षिक योजनेतून निधी दिला त्याप्रमाणे महसूल लोक अदालतीला द्यावा, महसूल विभागाला अत्याधुनिक मल्टीपर्पज वाहने मिळाल्यास विभागाच्या कामाला गती येईल, असेही ते म्हणाले.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी यांनी महसूल लोक अदालतीच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. ते म्हणाले राज्यातील मोठ्या प्रमाणात प्रलंबित महसूल प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुणे जिल्ह्याने पुढाकार घेऊन ही लोक अदालत आयोजित केली आहे. जिल्ह्यात मंडल अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, अपर जिल्हाधिकारी स्तरावर ३१ हजारावर महसूली प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ११ हजार ५८९ प्रकरणे या अदालती मध्ये ठेवण्यात आली आहे. यापुढेही दर तीन महिन्यांनी महसूल लोक अदालतीचे आयोजन करून दाव्यांची संख्या ३१ हजारावरून १० हजारापर्यंत आणण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ईक्यूजे कोर्ट, ई- हक्क प्रणाली, ई- फेरफार नोंदणी, पानंद रस्ते खुले करण्याची मोहीम, नाविन्यपूर्ण असा सेवादूर उपक्रम आदींची माहिती दिली. महाखनिज व बांधकाम परवानगी एकात्मिक प्रणालीवर आणल्यामुळे १५० कोटी रुपयांच्या महसूलात वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महसूल लोक अदालतीत निकाली निघालेल्या प्रकरणातील पक्षकारांना प्रातिनिधीक स्वरुपात निकालपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी वकील आणि पक्षकार यांनी प्रातिनिधीक स्वरुपात मनोगत व्यक्त केले.

अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी आभार व्यक्त केले.